मराठी माणसाचा मानदंड

राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २५९ ✻ सातारा ✻ सातारा शनिवार दि. १ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

हजारो वारकऱ्यांना उच् एकनाथ शिंदेंचा एक कॉल; पांडुरंगाचा सेवक म्हणून सेवा करणार

पुणे : मागील वर्षी प्रमाणे यावर्षी देखील आषाढी एकादशीपूर्वी एस.टी.बसेस,पाणी,स्वछता,आरोग्य आदी नियोजनव्यवस्थेचा पंढरपूरात जाऊन आपण स्वतः आढावा घेणार असून वारकरी बांधवांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री म्हणून नाही तर पांडुरंगाचा सेवक म्हणून ही सेवा करणार असल्याचं मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेंनी वारकऱ्यांना सांगितले.

जगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा त्रिशकोत्तर अमृतमहोत्सवी ३७५ वा वैकुंठगमन सोहळा सप्ताह सासवड येथे सुरू आहे. या सोहळ्याला नियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित राहू न शकलेल्या मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी फोनवरून वारकऱ्यांना संबोधित केले. यावर्षीच्या आषाढी वारीचे नियोजन हे मागील वर्षीप्रमाणेच निर्मल वारी,आरोग्यमय वारी अशा स्वरुपाचे व सर्वसुविधायुक्त करणार आहोत. कोणत्याही राजसत्तेला धर्मसत्तेचा आशीर्वाद हा असावाच लागतो आणि याचसाठी तुम्हा संतमंडळींचे धार्मिक, अध्यात्मिक अधिष्ठान खूप मोलाची भूमिका निभावत असल्याचं शिंदे यांनी वारकऱ्यांना सांगितले.तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये वारकरी संप्रदायाच्या आशिर्वादाचा, सहकार्याचा आणि समन्वयाचा महत्वपूर्ण वाटा आहे. पंढरपूर मंदिर आणि परिसर विकास आराखडा तयार करुन यासंदर्भातील कामे देखील अगदी प्रगतीपथावर आहेत. पालखी मार्गांची कामे देखील दर्जेदार झाली आहेत. चंद्रभागा घाटाचे काम देखील पूर्णत्वाचे स्वरुप धारण करत आहे.

महाराष्ट्रातील अनेक धार्मिक गडांच्या, तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी शासनाने अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद केली आहे. यासोबतच वारीमध्ये लाखो भाविकांसाठी मोफत आरोग्य शिबीरांचे नियोजन मागील वर्षीप्रमाणे यावर्षी देखील करण्यात येणार आहे. अशी एक ना अनेक वारकऱ्यांशी निगडीत असणारी कामे शासन करत आहे अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली.

दरम्यान, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा आधार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली हे या संप्रदायाचे पाया आहेत तर जगद्गुरु संत तुकोबाराय हे कळस ! महाराष्ट्रातील सर्वच संतमंडळींनी मानवाला जीवन जगण्यासाठी दिलेला व्यापक दृष्टीकोन अनेक मोठमोठ्या समस्येवरील उपाय ठरतो आहे. ४५०० अभंगांचे लिखाण करत समाजाला उपदेश करणाऱ्या जगद्गुरु संत तुकोबारायांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा आणि यानिमित्ताने सासवड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे निमित्त साधून भरलेला वैष्णवांचा मेळा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे वैभव प्रतिबिंबीत करणारा होता.

दक्षिणेसह उत्तरेकडे काँग्रेसला चांगल्या निकालाची अपेक्षा

रणनीती यशस्वी होणार?

नवी दिल्ली : गेल्या २ निवडणुकीत सुमार कामगिरी करणाऱ्या काँग्रेसला यंदा चांगल्या निकालाची अपेक्षा आहे. मागील निवडणुकीत ज्या राज्यातकाँग्रेसनंचांगले यश मिळवलं त्या राज्यासह उत्तरेकडील काही राज्यात काँग्रेस मोठी अपेक्षा ठेवून आहे. मागच्या निवडणुकीत उत्तरेकडील राज्यात काँग्रेस केवळ १-२ जागांवर विजयी झाली होती. त्याठिकाणी यंदा जागा वाढतील असा विश्वास काँग्रेस नेत्यांना आहे.राहुल गांधीयांनी काढलेली भारत जोडो यात्रा त्यामागचं प्रमुख कारण ठरेल असं काँग्रस नेते सांगतात. पण काँग्रेसनं पहिल्यांदाच इतिहासात ३२७ इतक्या कमी जागांवर निवडणूक लढवली आहे.

दक्षिणेकडे काँग्रेस मजबूत२०१४ मध्ये काँग्रेस प्रणित यूपीए सरकारला देशात उत्तरेकडील राज्यांनी नाकारलं होतं तेव्हा दक्षिणेतील राज्यांनी काँग्रेसची लाज राखली. त्यावेळी ४६४ जागा लढणाऱ्या काँग्रेसला एकूण ४४ जागांवर विजय मिळाला. ज्यात कर्नाटकातील ९ आणि केरळमधील ८ जागांचा समावेश होता.

नुकतेच ज्या तेलंगणात काँग्रेसचं सरकार बनलं तिथे केवळ २ जागा पक्षाला जिंकता आल्या होत्या. तर तामिळनाडू, आंध्र प्रदेशात पक्षाला खातेही उघडता आलं नाही.दुसरीकडे २०१९ च्या निवडणुकीत काँग्रेसनं ४२१ जागांवर निवडणूक लढली. त्यातील ५२ जागा जिंकल्या. तेव्हा कर्नाटकात १ जागेवर तर केरळात १५ जागांवर काँग्रेस विजयी झाली तर

आंध्र प्रदेशनं काँग्रेसला पुन्हा निराश केले होते. मागील निवडणुकीत तामिळनाडूत ८, तेलंगणात १ जागेवर काँग्रेसनं विजय मिळवला. यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसला केरळ आणि तामिळनाडू येथे पुन्हा तशीच कामगिरीची अपेक्षा आहे. तर तेलंगणा, कर्नाटक याठिकाणी काँग्रेस सरकार आहे. त्यामुळे या राज्यात काँग्रेसच्या जागा वाढण्याचा विश्वास काँग्रेस नेत्यांना आहे. उत्तरेकडे काँग्रेसला आशावादकाँग्रेसची नजर यावेळी अशा राज्यांवर आहे जिथं मागील निवडणुकीत त्यांना विजयाचं खाते उघडता आले नाही. गुजरात, राजस्थान, उत्तराखंड, हिमाचल प्रदेशसारख्या राज्यात मागील २ निवडणुकीत काँग्रेसला फटका बसला. तर छत्तीसगड, हरियाणा, मध्य प्रदेश, यूपी आणि महाराष्ट्र याठिकाणी काँग्रेस केवळ १-२ जागांवर जिंकली. यंदाच्या निवडणुकीत महाराष्ट्र, राजस्थान, बिहार, हरियाणा आणि छत्तीसगड या राज्यांकडून काँग्रेसला मोठी अपेक्षा आहे.महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या माध्यमातून काँग्रेस यंदा चांगली कामगिरी करेल असं मानलं जातं. त्याचप्रमाणे गुजरात, हरियाणा, राजस्थानात पक्षाचे उमेदवार जिंकू शकतात असं नेत्यांना वाटतं. हरियाणात शेतकरी नाराजी, महिला पैलवानांमधील असंतोष, जातीय समीकरणे यातून सत्ताधाऱ्यांविरोधात नाराजी आहे. उत्तर प्रदेशात यंदा समाजवादी पक्षासोबत काँग्रेस रिंगणात आहे. बिहारमध्ये आरजेडीसोबत काँग्रेसनं आघाडी केली आहे. झारखंडमध्येही हेमंत सोरेन यांच्या अटकेची सहानुभूती आघाडीला मिळेल असं काँग्रेसला वाटतं.

काँग्रेसची रणनीती यशस्वी होणार?

काँग्रेसला यंदाच्या निवडणुकीत चांगल्या निकालाची अपेक्षा आहे. त्यामागे खास रणनीती आहे. याच रणनीतीतून काँग्रेसनं संपूर्ण निवडणूक लढवली. महागाई, बेरोजगारी, संविधान वाचवण्याची लढाई यासारख्या मुद्द्यावर जनतेत जात लोकांशी निगडीत मुद्द्यापासून प्रचार कुठेही भरकटला जाऊ नये यासाठी काँग्रेसनं काळजी घेतली. यंदा काँग्रेसनं अजेंडा सेट केला होता. त्यानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सत्ताधारी पक्षांवर आक्रमक प्रचार सुरू होता. काँग्रेसनं प्रसिद्ध केलेला जाहिरनामा आणि त्यातील ५ सामाजिक न्याय आणि २५ गॅरंटी यावरून ते जनतेत गेले. त्यामुळे काँग्रेसला आत्मविश्वास वाढला आहे. आता त्यांची ही रणनीती कितपत यशस्वी होणार हे ४ जूनच्या निकालातून स्पष्ट होईल.

बोलायला नाही, कर्तृत्त्व दाखवायला हिंमत लागते

परकीय गुंतवणुकीवरुन देवेंद्र फडणवीसांचा विरोधकांना टोला

मुंबई : आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशातील थेट परकीयगुंतवणूक३.५ टक्क्यांनी घसरली असली तरी राज्यपातळीवरगुंतवणूकआकर्षित करण्यातमहाराष्ट्रप्रथम क्रमाकांवर आहे. केंद्रीय औद्योगिक आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाने (डीआयपीपीटी) गुरुवारी थेट परकीय गुंतवणुकीबाबतचा अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालानंतर राज्याचेउपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांनी सोशल मीडियावरील एक्सवर बोलायला नाही, कर्तृत्त्व दाखवायला हिंमत लागते अशी पोस्ट टाकून विरोधकांना टोला लगावला आहे.-उत्तएठढखडएचएछ्ढझ्रेशीशव लूएफडीआय आकर्षित करण्यातमहाराष्ट्र२०२२-२३ मध्ये प्रथम क्रमांकावर राहिल्यानंतर आता २०२३-२४ या आर्थिक वर्षांत सुद्धा पहिल्या क्रमांकावर आला आहे. केंद्र सरकारच्या डीपीआयआयटीने काल ३० मे रोजी ही आकडेवारी जाहीर केली. या आकडेवारीनुसार, महाराष्ट्राने गेल्यावर्षीपेक्षा अधिक परकीय गुंतवणूक यावर्षी प्राप्त केली आहे, असेदेवेंद्र फडणवीसयांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.याचबरोबर, २०२२-२३ या आर्थिक वर्षांत १,१८,४२२ कोटी तर २०२३-२४ या वर्षात १,२५,१०१ कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. या आर्थिक वर्षांतील गुंतवणूक ही गुजरातमध्ये प्राप्त झालेल्या एकूण गुंतवणुकीपेक्षा दुपटीहून अधिक आहे, तर दुसर्या क्रमांकावरील गुजरात आणि तिसर्या क्रमांकावरील कर्नाटकच्या एकूण बेरजेपेक्षाही अधिक आहे. महाविकास आघाडीच्या काळात गुंतवणूक आकर्षित करण्यात पिछाडलेला महाराष्ट्र पुन्हा एकदा सलग दोन वर्ष पहिल्या क्रमांकावर आहे.

महाराष्ट्रातील जनतेचे मी मनापासून अभिनंदन करतो, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.दरम्यान, राज्यात सत्तांतर झाल्यापासून विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांना वेगवेगळ्या मुद्द्यांवरून घेरलं जातं. राज्यातील परकीय गुंतवणूक घटली आहे. परदेशातील उद्योग अन्य राज्यांत जात आहेत, असा दावा विरोधकांकडून केला जात आहे. तर राज्यातील परकीय गुंतवणूक वाढली आहे. आगामी काळातही अनेक उद्योग राज्यात येतील, असे सत्ताधाऱ्यांकडून सांगितले जाते. दरम्यान, आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे, असे सोशल मीडियावरून सांगितले आहे. त्यामुळे आता विरोधक काय प्रतिक्रिया देणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

मराठवाड्यात महायुतीला मिळणार भोपळा?

दानवेही पडणार, चंद्रकांत खैरेंचा दावा

छत्रपती संभाजीनगर - मराठवाड्यात आठच्या आठ जागामहाविकास आघाडीच्यायेणार आहेत असा आमचा रिपोर्ट आहे. बीडमध्ये पंकजा मुंडे, जालनात रावसाहेब दानवे हेदेखील पडणार असे संकेत आहेत. त्यांचीच माणसं बोलतायेत. हे दोन्ही नेते पडतील असंभाजपानेतेच म्हणतायेत असा दावा ठाकरे गटाचे नेतेचंद्रकांत खैरेयांनी केला आहे.-उत्तएठढखडएचएछ्ढझ्रेशीशव लूचंद्रकांत खैरेम्हणाले की, मागील निवडणुकीत रावसाहेब दानवेंनीच मला पाडलं. त्यामुळे परमेश्वर बदला घेतो. राज्यातमहाविकास आघाडीला३२ जागा येतील. अनेकांनी हा अंदाज वर्तवला आहे. महायुतीला ८ ते १० जागा मिळतील. अपक्ष वैगेरे कोण येणार नाही. महायुती, मविआत थेट लढत आहे. एकनाथ शिंदे संपले. सगळे खोके घेऊन गेलेत. लोकांना त्यांच्याबद्दल राग आहे. उद्धव ठाकरेंना सोडून दिले. ज्याने मोठे केले त्यांच्या विरोधात जातात त्यामुळे लोक विरोधात आहेत असं त्यांनी म्हटलं.तसेच चंद्रकांत खैरे हे धार्मिक आहेत त्यामुळे लोकांना आवडतं. अनेकांनी माझ्या विजयासाठी नवस केला आहे. उद्धव ठाकरेंमागे जे वलय निर्माण झालं त्यातून अधिक बळ मिळालं. हा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचा गड आहे. तो कुठे जाऊ शकत नाही. महाविकास आघाडीच्या सर्व नेते, पदाधिकाऱ्यांनी काम केले आहे. अनेक मित्र मंडळींनी मदत केली आहे.

दारू विकणाऱ्या माणसाला मदत कुणी केली नाही अशा शब्दात चंद्रकांत खैरेंनी नाव न घेता संदीपान भुमरे यांच्यावर निशाणा साधला.दरम्यान, लोकांचा विश्वास माझ्यावर आहे. विरोधी उमेदवार जिंकून येणं कठीण आहे. हे होऊ शकत नाही. छत्रपती संभाजीनगरच्या लोकांनीही तुम्ही विजयी होणार असं सांगितले आहे. मी १० हजार काय, ५००० हजार असो पण मी निवडून येणार आहे. मला अनेक जण भेटतात, आम्ही तुम्हालाच मतदान केले. दारु विकणाऱ्या माणसाला कशाला मतदान करायचे? असं महिला बोलत होत्या. दारूबाबतीत लोकांना प्रचंड राग आहे. २५ दुकाने त्याने उघडली आहेत. लोकांची सेवा करायला तुम्ही मंत्रिमंडळात गेला की स्वत:च्या सेवेसाठी हा लोकांना प्रश्न आहे असंही चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं.

सातारा लोकसभा निवडणूक मतमोजणीमुळे औद्योगीक वसाहतीतील वाहतुकीत बदल

सातारा : सातारा लोकसभा मतदारसंघ निवडणुकीची मतमोजणी दि. ४ जून रोजी सातारा औद्योगिक वसाहतीतील डीएमओ गोदामात होणार आहे. यामुळे नागरिकांची गर्दी होणार असल्याने गोदाम परिसरात वाहतूक व्यवस्थेत पोलिसांकडून बदल करण्यात आलेला आहे.-

याबाबत पोलिस अधीक्षक समीर शेख यांनी आदेश काढला आहे. हा आदेश दि. ३ जून रोजीच्या रात्री ११ वाजून ५५ मिनीटांपासून लागू होणार आहे. खालील मार्गावरील वाहतुकीत बदल करण्यात आलेला आहे. त्यानुसार वेणूगोपल फुडस (पारले कंपनी) ते कवित्सू कंपनी युनीट क्रमांक दोन कंपनीकडे डीएमओ गोदामासमोरुन येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना (शासकीय वाहने वगळून) पूर्णत: प्रवेश बंदी असणार आहे. सुटकेस चौक येथून वेणूगोपाल फुडस कंपनीकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांना बंदी. अजिंक्यतारा सहकारी कृषी केंद्राकडून कृषीटेक कंपनीमार्गे डीएमओ गोदामाकडे जाणाऱ्या-येणाऱ्या वाहनांनाही प्रवेश बंद असणार आहे. तर भोर फाट्याहून गोदामाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांनाही प्रवेश मिळणार नाही.पार्किंग ठिकाणे निश्चित- भोर फाटा येथून नवीन औद्योगिक वसाहतीकडे जाणारी वाहने रस्त्याच्या बाजुला पार्किंग करता येतील.

जानाई मळाई रस्त्याने निवडणूक मतमोजणी निकालासाठी येणाऱ्या वाहनांना तळ्याजवळील पार्किंगपर्यंत जाता येणार आहे.

विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी

माजी मुख्यमंत्री आ पृथ्वीराज (बाबा)चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कामाला लागावे : नानाभाऊ पटोले

सातारा :- लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला चांगले यश येणार आहे. असे असले तरी आता ऑक्टोबरमधे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी माजी मुख्यमंत्री आ पृथ्वीराज (बाबा)चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कामाला लागावे अशा सूचना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांनी कराड येथे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्याशी बोलताना दिल्या.

प्रदेशाध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले सातारा जिल्ह्याच्या खाजगी दौऱ्यावर आले असता ते बोलत होते, यावेळी बोलताना नानाभाऊ पटोले म्हणाले की लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्ष राज्यात फिनिक्स पक्ष्याप्रमाणे झेप घेणार असून किमान पंधरा पेक्षा जास्त जागा

जिंकून येतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राज्यात येत्या चार महिन्यात विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत, त्याची तयारी जिल्ह्याच्या आठ विधानसभा मतारसंघातील संघटनात्मक बूथ कमिटी, मंडळ कमिटी तयार करून प्रत्येक बुथवर कमीतकमी ५ कार्यकर्ते नेमून काम सुरू करा असे सातारा जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष डॉ सुरेशराव जाधव यांना विधानसभेच्या रणसंग्राम ला सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

पटोले यांचे कराड विमानतळावर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ सुरेशराव जाधव, यांनी स्वागत केले, यावेळी उपाध्यक्ष प्रा धनाजी काटकर, जिल्हा सरचिटणीस नरेश देसाई, विराज शिंदे,ओबिसी प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी, कराड उत्तर चे अध्यक्ष निवास थोरात, झाकीर पठाण, संजय तडाखे, नितीन थोरात, उमेश मोहिते इत्यादी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले आमदार वाजाहात मिर्झा, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चे माजी अध्यक्ष व सातारा लोकसभेचे माजी खासदार स्व: प्रतापराव भोसले यांच्या झालेल्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांची सत्वणपर भेट घेण्यासाठी भुईंज येथे आले होते.

घरे फोडा, पक्ष फोडा, ५० खोके ओके हाच प्रमुख उद्योग; सुप्रिया सुळेंचा सरकारवर निशाणा

पुणे : पोर्शे अपघात प्रकरणातसरकारच्यावेगवेगळ्या खात्याकडून दररोज वेगवेगळे खुलासे करण्यात येत आहेत. गृहमंत्री असलेलेदेवेंद्र फडणवीसपुण्यात येऊन गेले, त्यांनी कोणालाही सोडणार नाही असे सांगितले. मग आता त्यांनीच राज्याला व देशाला नक्की काय ते सांगावे असे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

अहिल्याबाई होळकर यांच्या सारसबाग येथील पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सुळे शुक्रवारी दुपारी पुण्यात आल्या होत्या. त्यानंतर पत्रकारांबरोबर बोलताना त्यांनी कल्याणीनगर अपघात प्रकरणावरून राज्यसरकारवरटीका केली. पुण्यात देशपरदेशातून मुले शिक्षणासाठी येतात. पण, इथे ड्रग्ज कल्चर सुरू झाले आहे. अपघात होत आहेत. ससूनमधून अनेक गोष्टी बाहेर येत आहेत. पुण्याची ही बदनामी सरकारच्या निष्क्रियतेमुळे होत आहे. हे सरकार गंभीर नाही. घरे फोडा व पक्ष फोडा, ५० खोके ओके हाच त्याचा उद्योग आहे असे सुळे म्हणाल्या.हिंजवडी येथून आयटी उद्योग बाहेर जात आहेत, याकडे सुळे यांचे लक्ष वेधले असता त्या म्हणाल्या, हेही सरकारचेच अपयश आहे. शरद पवार यांनी जाणीपूर्वक हा आयटी उद्योग पुण्यात आणला. त्याचे एक स्वतंत्र मॉडेल तयार केले.

संपादकीय

तंबाखू हटवा-बालपण वाचवा

भारत देशामध्ये शेती आणि कापड उद्योगानंतर सर्वाधिक अनौपचारिक अर्थव्यवस्थेत वाढ कमी करणे. या क्षेत्रामध्ये जबाबदारी स्वीकारली तर नक्कीच

रोजगार हा विडी उद्योगातून मिळतो. विशेष म्हणजे हजारो कोटींचा महसूल देखील याच उद्योगातून सरकारला प्राप्त होत असतो. विडी उद्योगात प्रत्यक्षपणे ८० लाखाहून अधिक कामगार काम करतात. यात ९०% कामगार हा महिला वर्ग आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील प्रत्येक १०० पूर्ण वेळ कामगारांपैकी एक कामगार १४ पेक्षा कमी वयाचा आहे त्यातील एक तृतीयांश बालकामगार हे नऊ वर्षापेक्षा कमी वयाचे आहेत. नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन फॉर चाइल्ड राइट्स (छउझउठ) च्या २०१३ च्या अहवालानुसार सर्व काम करणाऱ्या मुलांपैकी २१% मुले ही विडी कामगार उद्योगात काम करतात. २०११ च्या जनगणनेनुसार याचा अर्थ असा होईल की, १४ वर्षांखालील नऊ लाख मुले ही विडी उद्योगात काम करीत आहेत. प्रत्यक्षात हा आकडा यापेक्षा मोठा असू शकतो.

तंबाखू जगातून हद्दपार करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहेच त्याला वेळ लागेल परंतु तंबाखू उद्योगाच्या हस्तक्षेपापासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी आपण काही उपाय नक्कीच अमलात आणू शकतो. प्रथमता या क्षेत्रामध्ये मुले काम करणार नाही यासाठी काही उपाययोजना करणे आवश्यक आहे. ज्यात दारिद्र्य निर्मूलन, दर्जेदार शिक्षण, बालकामगार कायद्याची अंमलबजावणी करणे अवघड असल्यामुळे अनौपचारिक अर्थव्यवस्था त्यांना कामावर ठेवते. तसे इतर अनेक घटक ही याला कारणीभूत आहेत. भारतीय राज्यघटनेचे कलम २४ अंतर्गत धोकादायक उद्योगांमध्ये बालमजुरीवर बंदी घातली आहे. आवश्यकता आहे की या कलमाच्या अंमलबजावणी काटेकोरपणे करणे. निर्व्यसनी तरुण पिढी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. आज संपूर्ण भारत देशात २८.६% प्रौढ तंबाखूचे सेवन करीत आहेत तर आपल्या महाराष्ट्र राज्यात प्रौढ व्यक्तींचे तंबाखू सेवन करण्याचे प्रमाण जवळपास २६.६% आहे. मुलांचा विचार केला तर महाराष्ट्रात जवळपास ५.१% बालक हे युवा

तंबाखूचे सेवन करीत आहेत. भारत हा जगातील सर्वात तरुण देश जवळ देशात जवळपास ३९% बालक असलेला देश, म्हणजे उद्याचे . या बालकांचे भविष्य जर आपण तंबाखू उद्योगाच्या हस्तक्षेप पासून वाचवायचे असेल तर शालेय अभ्यासक्रमातून व्यसनमुक्तीचे संस्कार, शालेय परिसर व्यसनमुक्त व तंबाखूमुक्त करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर समाजावर प्रभाव असणाऱ्या व्यक्तींनी तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या जाहिराती पासून लांब राहण्याची नैतिक

आपण तंबाखू उद्योगाच्या हस्तक्षेपा करू शकू उद्योगापासून करण्यासाठी सामाजिक संयोजनाची गरजेचे आहे. धोरणे पुढील जाहिरात जाहिराती प्रायोजकत्वावर करणे २) तंबाखू उत्पादनांचे आकर्षण कमी करण्यासाठी लागू करणे. ३) कार्यक्रम धूम्रपणाचे अभ्यासक्रमामध्ये मुलांना शिकवण्यासाठी समाविष्ट करणे. सामाजिक अभियान; पाल्यांना बद्दल आणि तंबाखूच्या जोखमी मुलांचे प्रदर्शनापासून संरक्षण करण्याचे मोहीम सुरू पडताळणी आणि विक्री निर्बंध. अल्पवयीन मुलांना तंबाखूजन्य पदार्थांची विक्री रोखण्यासाठी कठोर वय पडताळणी प्रक्रिया लागू करणे व या कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यापासून मुलांचे संरक्षण . तंबाखू मुलांचे संरक्षण धोरणे शिक्षण व प्रयत्नांच्या अंमलबजावणी करणे यातील काही प्रमुख प्रमाणे. १) कठोर नियम; तंबाखूच्या जाहिरात आणि कडक बंदी लागू साधे पॅकिंग कायदे: साधे पॅकिंग कायदे शालेय शिक्षण तंबाखू सेवन, धोके शालेय अभ्यासक्रमांमध्ये ४) सामुदायिक जागरूकता पालकांना आणि बद्दल जागृती करणे. ५) वय युक्त्या; पान, ठेवणे, नसलेस सोपा चुंगाम श्वास जेव्हा उभ्याने अवस्थेत पेला देखील होते. तलफ तुमच्यावर भयंकर तुम्हाला तलफ पुढील काहीतरी करणे. २ विलंब घेणे. ४) बोलणे. ६) विक्रेत्यांसाठी कठोर शिक्षा करणे. ६) तंबाखूमुक्त झोन सार्वजनिक ठिकाणी विशेषता शाळा क्रीडांगण आणि क्रीडासुविधा यांच्या आसपास तंबाखूमुक्त क्षेत्र स्थापन करणे

तंबाखू सोडण्यासाठी च्या सिगारेट, जर्दा लपूवुन जेणेकरून नजरेसमोर ते आठवत नाही हा एक परंतु सहाय्यक उपाय आहे. सिगारेट पान जर्दा खाणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहणे. तोंडात चॉकलेट पेपरमेंट इत्यादी ठेवण्याचा प्रयत्न करणे व दीर्घ घेण्याचा सराव करणे. तल्लफ येईल तेव्हा किंवा बसलेल्या दीर्घ श्वास घ्यावा. एक पाणी प्यावे आणि व्यायामाने तल्लफ घालण्यास मदत जेव्हा तंबाखू सेवनाची येईल तेव्हा तुमच्या मुलांबद्दल आणि त्यांच्या भवितव्याबद्दल विचार करा.

तंबाखूमुळे होणाऱ्या रोगांचा विचार करा. जेव्हा धूम्रपान व तंबाखूची होते तेव्हा प्रामुख्याने चार गोष्टी लक्षात ठेवा १) वेगळे करण्याचा प्रयत्न) सिगरेट पिण्यामध्ये करणे. ३) दीर्घ श्वास पाणी पिणे. ५) स्वत:साठी सकारात्मक दररोज आरामाच्या तंत्राचा वापर करणे. तसेच योग,

आणि त्याची देखरेख करणे ७) इ सिगारेट्स आणि वार्फिगचे नियमन ई सिगारेट्स आणि वाफिंग उत्पादकांना कव्हर करण्यासाठी नियमांचा विस्तार करणे लक्ष , जे अधिकाधिक तरुणांना केले जात आहेत.

चन्होली फाटा श्रीराम कॉलनी रस्त्याची दुरवस्था

पिंपरी चिंचवड : पिंपरी चिंचवड चन्होली (बु.) च-होली फाट्यावरील श्रीराम कॉलनी रोडवर अडथळा ठरत असलेल्या सोसायटी धारकांनी छाटलेल्या फांधा रोडवर फांद्याचे ढिग जागोजागी १० दिवसापासून तशाच पडलेल्या आहेत. तसेच काही ठिकाणी कच-याचे ढिग पडावेले आहेत. १५ दिवसा- पासून रोडची साफसफाई नाही. आरोग्य निरीक्षकाचे दुर्लक्षामुळे कचऱ्याचे ढिग, फांद्यांचे ढिग बनेडकील व र पाकापाचोळा रोडवर पडल्यामुळे याची येथील नागरीक त्रस्त तर आहेतच ये-जा करणारी बाहणे व नागरीकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या या राडारोड्या मुळे मोठी दुर्घटना घडू शकते. याला जबाबदार कोण? पालीका अधिकाऱ्यांचे दुर्लभ आणी

संबंधीत ठेकेदाराचा ढिसाळ कारभार चाचा नागरिकांना कविनाकारण त्रास सहन करावा लागत आहे. याची संबंधितांनी तात्काळ दखल घ्यावी. अशी मागणी परिसरातील नागरिकांना होत आहे

यंदा बळीराजाला आनंदाचे दिवस

देशासहित राज्यात चांगला पाऊस पडणार

पुणे : यंदा देशभरात चांगलापाऊसपडणार आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरी, उत्तर महाराष्ट्रातही चांगला आणि विशेष म्हणजे मराठवाड्यात अतिशय चांगलापाऊसपडणार आहे. ग्रहांच्या युतीवरून आणि वराहमिहिर यांच्या संकेतानूसार हे भाकीत करण्यात येत आहे, अशी माहिती पर्जन्य अभ्यासक व हायटेक बायोसायन्सेस इंडियाचे अध्यक्ष डॉ. राघवेंद्र गायकैवारी यांनी दिली.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या वतीने शुक्रवारी (दि.३१) 'वेध पर्जन्यमानाचा : आधार प्राचीन वाङ्:मयाचा' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी भांडारकर संस्थेचे मानद सचिव सुधीर वैशंपायन, ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे उपाध्यक्ष दीपक जोशी उपस्थित होते.

डॉ. गायकैवारी म्हणाले, ग्रहांची स्थिती आणि त्याचा पावसावर होणारा परिणाम याविषयी गणितीय पध्दतीने आम्ही अभ्यास केला आहे. होळी आणि अक्षयतृतीया या दोन दिवशी वाऱ्याची दिशा कशी आहे, त्यानूसार ठरवतो की, त्या स्थानिक पातळीवर कसा पाऊस असेल. याबद्दलचे अंदाज वर्तविता येतो. हा अंदाज ८० ते ९० टक्के बरोबर येतो. याचा वापर शेतकऱ्यांनी करायला हवा.

कोणत्या भागात किती पाऊस पडेल, याबाबत आयएमडी सांगत नाही. परंतु, या पध्दतीने ते सांगता येईल. त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.'' ''कुठले धान्य लावावे, कोणत्या धान्याला भाव येईल, याचे आर्थिक गणित वराहमिहीर यांनी लावलेला आहे. त्या काळात बारा बालुतेदारांवर आर्थिक व्यवस्था होती. त्यामुळे त्यांनी सर्व गोष्टींचा अभ्यास करून पावसाबद्दल भाकीते केली आहेत. या सर्वांचा अभ्यास आम्ही करतोय आणि त्यावर गणितीय पध्दत विकसित करत आहोत.

देहूत वृक्षारोपन करून राजमाता अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

देहू : राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या २९९ व्या जयंती निमित्त पुण्याश्लोक अहिल्यादेवी होळकर जनसेवा फाऊंडेशन व वृक्षदाई प्रतिष्ठानच्या वतीने श्री क्षेत्र देहूगाव येथे गायरानातील तलावाकाठी देशी ३०० झाडांचे वृक्षारोपन अहिल्याबाई होळकरांचे वंशज स्वप्नील राजे होळकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा पूजा दिवटे, मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, उद्योजक अरूण पवार, रमेश लबडे, देहूगाव राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष विवेक काळोखे, वृक्षदाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवाजी महाराज मोरे, सचिव संतोष हगवणे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष

राजेंद्र गाडेकर, उपाध्यक्ष ॲड. महेश घोडके, सचिव सत्यवान वाघमोडे, डॉ.श्वेता गाडेकर, भागवत सोनटक्के, खजिनदार भारत रुपनर, कार्याध्यक्ष योगेश धरम, केरबा वाघमोडे, जगन्नाथ जरग, अमोल ढवणे, रामदास दोलतडे, रेखा वैद्य, संगिता घोडके आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी स्वप्नील राजे होळकर म्हणाले की महिला सक्षक्तीकरण कसे असते व राज्याचा कारभार कशा उत्तम पध्दतीने करणाऱ्या राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी आपले आयुष्य लोककल्ण्यासाठी घालवले, एखादे युध्द न लढता कसे जिंकावे हे त्यांनी दाखवून दिली. सात बारा म्हणजे काय ही संकल्पना राबवून आपल्या प्रजेला सुखी करण्याचे काम केले. पाच झाडे सरकारला व सात झाले शेतकऱ्याला असा पध्दतीने नोंद करण्याची पध्दत विकसित केली, यामुळे आज देहू येथे वृक्षारोपन करून या गोष्टीला उजाळा देत आहोत. यावेळी मुख्याधिकारी निवेदिता घार्गे, शिवाजी महाराज मोरे, संतोष हगवणे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यावेळी या तलावाचे अहिल्याबाई होळकर तलाव असे नामकरण करावे अशी मागणी राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आली.

हजारो वारकऱ्यांना उच् एकनाथ शिंदेंचा एक कॉल; पांडुरंगाचा सेवक म्हणून सेवा करणार

पुणे : मागील वर्षी प्रमाणे यावर्षी देखील आषाढी एकादशीपूर्वी एस.टी.बसेस,पाणी,स्वछता,आरोग्य आदी नियोजनव्यवस्थेचा पंढरपूरात जाऊन आपण स्वतः आढावा घेणार असून वारकरी बांधवांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ देणार नाही. मुख्यमंत्री म्हणून नाही तर पांडुरंगाचा सेवक म्हणून ही सेवा करणार असल्याचं मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेंनीवारकऱ्यांना सांगितले.-ऊतएठढखडएचएछढजगदगुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा त्रिशकोत्तर अमृतमहोत्सवी ३७५ वा वैकुंठगमन सोहळा सप्ताह सासवड येथे सुरू आहे. या सोहळ्याला नियोजित कार्यक्रमामुळे उपस्थित राहू न शकलेल्या मुख्यमंत्रीएकनाथ शिंदेयांनी फोनवरून वारकऱ्यांना संबोधित केले. यावर्षीच्या आषाढी वारीचे नियोजन हे मागील वर्षीप्रमाणेच निर्मल वारी,आरोग्यमय वारी अशा स्वरुपाचे व सर्वसुविधायुक्त करणार आहोत. कोणत्याही राजसत्तेला धर्मसत्तेचा आशीर्वाद हा असावाच लागतो आणि याचसाठी तुम्हा

संतमंडळींचे धार्मिक, अध्यात्मिक अधिष्ठान खूप मोलाची भूमिका निभावत असल्याचं शिंदे यांनी वारकऱ्यांना सांगितले.तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासामध्ये वारकरी संप्रदायाच्या आशिर्वादाचा, सहकार्याचा आणि समन्वयाचा महत्वपूर्ण वाटा आहे. पंढरपूर मंदिर आणि परिसर विकास आराखडा तयार करुन यासंदर्भातील कामे देखील अगदी प्रगतीपथावर आहेत. पालखी मार्गांची कामे देखील दर्जेदार झाली आहेत. चंद्रभागा घाटाचे काम देखील पूर्णत्वाचे स्वरुप धारण करत आहे. महाराष्ट्रातील अनेक धार्मिक गडांच्या, तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी शासनाने अर्थसंकल्पात भरीव आर्थिक तरतूद केली आहे. यासोबतच वारीमध्ये लाखो भाविकांसाठी मोफत आरोग्य शिबीरांचे नियोजन मागील वर्षीप्रमाणे यावर्षी देखील करण्यात येणार आहे. अशी एक ना अनेक वारकऱ्यांशी निगडीत असणारी कामे शासन करत आहे अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिली.दरम्यान, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राचा आधार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली हे या संप्रदायाचे पाया आहेत तर जगद्गुरु संत तुकोबाराय हे कळस ! महाराष्ट्रातील सर्वच संतमंडळींनी मानवाला जीवन जगण्यासाठी दिलेला व्यापक दृष्टीकोन अनेक मोठमोठ्या समस्येवरील उपाय ठरतो आहे. ४५०० अभंगांचे लिखाण करत समाजाला उपदेश करणाऱ्या जगद्गुरु संत तुकोबारायांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा आणि यानिमित्ताने सासवड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे निमित्त साधून भरलेला वैष्णवांचा मेळा महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे वैभव प्रतिबिंबीत करणारा होता असंही मुख्यमंत्र्यांनी म्हटलं.

नाशकात डेंग्यूची रुग्णसंख्या १०४ पार, नागरिकांमध्ये चिंतेचं वातावरण

नाशिक : पावसाळा सुरू होण्यापूर्वीच शहरात डेंग्यूने डोके वर काढल्याने नागरिक चिंतीत झाले आहे. जानेवारी ते मे महिन्यात रुग्णसंख्या १०४ वर गेली असून मे महिन्यात ३३ जण पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. मे महिन्यातच रुग्णांची संख्या तब्बल ३३ वर गेली आहे. त्यामुळे शहर डेंग्यूचा हॉटस्पॉट झाला आहे. यामुळे आरोग्य विभाग देखील सतर्क झाला असून उपाययोजना करण्यात येत आहे.

दरम्यान पावसाळ्यात डेंग्यूचे रुग्ण वाढत असल्याचे दिसते. मात्र पावसाळ्यापूर्वीच डेंग्यूच्या रुग्णांची संख्या शंभरी पार गेल्याने पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिघण्याची शक्यता आहे. शहरात धूर फवारणी नावालाच असून प्रत्यक्षात ती होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जातो आहे. तसेच जेथे फवारणी होते. तेथे केवळ धूराचीच फवारणी होते, डासांना प्रतिबंध घातला जाईल ती, औषधी धूर फवारणीमध्ये नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जातो आहे. लक्षणे आढळल्यास नागरिकांनी रुग्णालयात जाऊन त्वरित तपासणी करुन घ्या असे आवाहन नागरिकांना केले आहे.

शहरातील प्रभागाच्या व्याप्तीनुसार धूर फवारणी केली जाते. शहरात जानेवारी ते मे महिन्यापर्यंत १०४ वर रुग्ण संख्या गेली असून आरोग्य विभाग यावर लक्ष ठेऊन आहे. नागरिकांनी घाबरून न जाता डॉक्टरांनी संपर्क करावा.

लोकसभा निवडणुकीत पारडं मविआच्या बाजूने फिरल्यास छगन भुजबळ मोठा निर्णय घेणार?

मुंबई: गेल्या काही दिवसांमध्ये अजितदादा गटातील ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी वक्तव्यं पाहिल्यास ते महायुतीवर (चरहर्ळीळ) नाराज तर नाहीत ना, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. याबाबत त्यांना विचारले असता, मी नाराज नाही, पण मी विरोधासाठी विरोध करत नाही, असे स्पष्टीकरण भुजबळांनी दिले. मात्र, तरीही भुजबळांच्या नाराजीच्या चर्चेचा जोर काही कमी झालेला नाही.

या सगळ्याची सुरुवात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने नाशिक लोकसभा मतदारसंघावरील दावा सोडला तेव्हापासून झाली. भाजप नेतृत्वही छगन भुजबळ यांना नाशिकमधून लोकसभेची उमेदवारी देण्यासाठी अनुकूल होते. मात्र, शिंदे गट या जागेसाठी शेवटपर्यंत अडून बसल्याने छगन भुजबळ यांची लोकसभा लढण्याची इच्छा फलद्रुप झाली नाही. तेव्हापासूनच छगन भुजबळ यांचे बिनसल्याचे पाहायला मिळत आहे.

छगन भुजबळांच्या नाराजीचे कारण?

सूत्रांच्या माहितीनुसार, नाशिक लोकसभेची जागा न मिळाल्यामुळेच छगन भुजबळ नाराज असल्याचे सांगितले जाते. नाशिकमधून लोकसभेला उभं राहण्याची इच्छा अपूर्ण राहिल्यानंतरच छगन भुजबळ यांनी महायुतीला अडचणीत आणणारी वक्तव्य करायला सुरुवात केली. गेल्या काही दिवसांमध्ये त्यांनी एकापाठोपाठ एक महायुतीच्या भूमिकेशी विसंगती साधणारी वक्तव्यं केली आहेत. महाडमध्ये जितेंद्र आव्हाड यांच्याकडून अनावधानाने घडलेल्या कृतीनंतर भाजप आणि अजितदादा गटाच्या नेत्यांनी त्यांच्याविरोधात रान उठवले होते. आव्हाड यांच्या प्रतिमेला जोडे मारुन आणि त्यांचे फोटो जाळून निषेध व्यक्त करण्यात आला होता. मात्र, आव्हाडांकडून ही कृती अजाणतेपणाने घडली असून त्यामुळे मनुस्मृतीच्या मूळ मुद्द्यावरुन लक्ष भरकटता कामा नये, असे सांगत छगन भुजबळ यांनी आव्हाडांची पाठराखण केली होती. त्यामुळे भाजप आणि अजितदादा गटाच्या नेत्यांनी आव्हाडांविरोधात सुरु केलेल्या आंदोलनातील हवाच निघून गेली होती.

छगन भुजबळांची महायुतीची डोकेदुखी वाढवणारी वक्तव्ये

✻ 'लोकसभा निवडणुकीत भाजपने दिलेल्या ४०० पारच्या नाऱ्याचा फटका बसला'

✻ लोकसभेला जागावाटपात घटक पक्षांकडून दबाव तंत्राचा वापर झाला, तो आता राष्ट्रवादीच्या बाबत विधानसभेला व्हायला नको.

विधानसभा निवडणुकीत ८० ते ९० जागा राष्ट्रवादीला आम्ही देऊ, असं आश्वासन सत्तेत सहभागी होताना भाजपने दिलं आहे. त्याची आठवण त्यांना करुन द्या.

छगन भुजबळ पुन्हा महाविकास आघाडीत जाणार का?

छगन भुजबळांची महायुतीला डोकेदुखी वाढवेल अशी वक्तव्यांची मालिका सुरु असताना दुसरीकडे महाविकास आघाडीशी जवळीकता साधता येईल, अशी वक्तव्यही भुजबळांनी केल्याचे पाहायला मिळाले. घाटकोपर होर्डिंग दुर्घटनेनंतर भाजपचे नेते सातत्यानं ज्यांच्यावर टीका करत होते त्या उद्धव ठाकरे यांचीच पाठराखण भुजबळांनी केल्याचं पाहायला मिळाले.

तर दुसरीकडे शरद पवारांचे निष्ठावंत म्हणून ज्यांची ओळख आहे त्या जितेंद्र आव्हाड यांची बाबासाहेब आंबेडकर प्रकरणात समोर येऊन पाठराखण करुन स्वत: साठी शरद पवार गटाचा रस्तादेखील छगन भुजबळांनी खुला केल्याची चर्चा सुरु झाली आहे. एकीकडे आव्हाडांची छगन भुजबळ यांनी पाठराखण केली तर दुसरीकडे छगन भुजबळ यांची संघटना असणाऱ्या समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी मनुस्मृतीविरोधात जोरदार आंदोलने राज्यभरात करून आव्हाड यांच्या विरोधातील विरोध कमी केल्याचं पाहिला मिळत आहे. एकंदरीतच ४ जून नंतरच्या निकालानंतर राज्यातील महाविकास आघाडीचं प्राबल्य वाढल्यास छगन भुजबळ यांनी महाविकास आघाडीची वाट धरल्याचे पाहिला मिळाल्यास नवल वाटायला नको.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

लोकसभा निकालानंतर राज्यात मंत्रिमंडळाचा विस्तार

नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता; महामंडळावरही नियुक्त्या होणार

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात मोठे बदल होण्याची शक्यता असून राज्यात मंत्रिमंडळाचा विस्तार (चरहरीरीहीर उरलळपर्शी एुरिपीळेप) होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामध्ये काही मंत्र्यांची खाती बदलली जातील, तसेच काही नवीन चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ज्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार नाही असे नेते नाराज होऊ नयेत म्हणून त्यांची वर्णी महामंडळावर लावण्यात येणार आहे.

पालक मंत्रिपदांची आदलाबदल

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर हा बदल केला जाणार असून काही पालकमंत्रीपदांचीही अदलाबदल करण्यात येणार असल्याची माहिती आहे. तसेच ज्या महामंडळावर अद्याप कोणतीही नियुक्ती करण्यात आली नाही त्यावरही नियुक्ती केली जाणार आहे. या संदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यात प्राथमिक चर्चाही झाल्याची माहिती मिळत आहे.

नवीन चेहऱ्यांना संधी

स्थानिक राजकारण, जातीय समीकरण आणि सध्याची राजकीय परिस्थिती पाहता नवीन चेहऱ्यांना संधी दिलं जाईल. सध्या अनेक मंत्र्यांकडे दोन-तीन खाती आहेत, त्यामध्ये बदल होऊन विधानसभेच्या संख्याबळानुसार त्याचे वाटप केले जाणार असल्याची माहिती आहे.

राज्यपाल नियुक्त १२ आमदारांची निवडही प्रलंबित असून त्याचाही निर्णय होणार असल्याची माहिती आहे. ज्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळणार नाहीत त्यांना महामंडळ देऊन त्यांची नाराजी दूर केली जाणार असल्याची माहिती आहे.

रिक्त असलेले महामंडळ

- सिडको
- महात्मा फुले महामंडळ
- आण्णाभाऊ साठे महामंडळ
- म्हाडा
- अपंग कल्याण
- चर्मोद्योग विकास महामंडळा
- महाराष्ट्र औद्योगीकरण विकास महामंडळ
- महाराष्ट्र कामगार कल्याण महामंडळ
- महारष्ट्र राज्य वखार महामंडळ
- महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळ
- महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ
- महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ
- महराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ
- महिला अर्थिक विकास महामंडळ

भरत गोगावले, संजय शिरसाठ यांना संधी मिळणार का?

राज्यात शिंदे-भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर दोन्ही पक्षाच्या प्रत्येकी नऊ जणांना मंत्रिपदाची संधी मिळाली होती. तेव्हापासून मंत्रिमंडळाच्या विस्ताराची चर्चा सुरू होती. नंतरच्या काळात अजित पवारांची राष्ट्रवादीही सत्तेत आल्याने त्यांनाही नऊ मंत्रिपदं देण्यात आली. त्यामुळे शिंदे गटातील इच्छुक असलेल्या आमदारांना मात्र मंत्रिपदाने हुलकावणी दिली.

शिंदे गटाचे भरत गोगावले, संजय शिरसाठ यांच्यासह अनेकजण मंत्रिपदाच्या शर्यतीत सुरूवातीपासूनच आहेत. भरत गोगावले यांनी त्यांची संधी हुकल्याने उघड नाराजी अनेकदा बोलून दाखवली आहे. त्यामुळे येत्या मंत्रिमंडळाच्या विस्तारात त्यांना संधी मिळणार का ते पाहावं लागेल.

ऐतिहासिक पंढरपूरच्या विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील तळघरात आतापर्यंत काय काय सापडलं?

पंढरपूर : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गेल्या काही दिवसांपासून जतन आणि संवर्धनाचं काम सुरू आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांनी जसं हे मंदिर पाहिलं होतं तसेच ते पुन्हा समोर आणण्याचं काम जोमात सुरू होतं. त्यातच गुरुवारी मध्यरात्री मंदिरात तळघर सापडलं आहे. हे तळघर जवळपास ७-८ फूटांचे असल्याचं दिसून आले.

यावेळी पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली तळघरातून अनेक पुरातन वस्तू, प्राचीन मुर्त्या, जुनी नाणी आणि काही बांगड्याचे अवशेष काढण्यात आले आहेत. आतापर्यंत या तळघरातून ३ दगडांच्या मूर्त्या बाहेर काढल्यात. मध्यरात्री मंदिरात काम करताना खोलीसदृश्य वास्तू आढळून आलं. त्यानंतर आम्ही जेव्हा पाहणी केली तेव्हा आतमध्ये ६ बाय ६ फूटाचे चेंबर आहे. त्याखालीही आणखी चेंबर आहे. खूप मोठ्या प्रमाण माती साचली आहे असं पुरातत्व विभागाच्या

अधिकाऱ्यांनी सांगितले. आतापर्यंत तळघरात काय सापडलं?मंदिरात सापडलेल्या या तळघरातून ३ मोठ्या दगडी मूर्त्या, २ छोट्या मूर्त्या आणि १ पादुका असे अवशेष सापडले आहेत. त्यासोबत मातीत काचेच्या बांगड्या त्याचे तुकडे आढळले आहेत. काही जुनी नाणी मोठ्या प्रमाणात सापडली आहेत. हे बांधकाम चुन्याचे प्लास्टर आहे.

आणखीही काही दगडी मुर्त्या तळघरात असल्याचं दिसून येते. पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने यांच्या देखरेखीखाली हे काम सुरू आहे. दरम्यान, सापडलेल्या मुर्त्या या १२-१३ व्या शतकातील असण्याची शक्यता आहे. यात व्यंकटेशाची मूर्ती आहे. काही मुर्त्या छोट्या आकाराच्या आहेत. एक मूर्ती ३ ते साडे तीन फुटाची आहे.

गेल्या २ महिन्यापासून मंदिर बंदविठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या संवर्धनाचे व जिर्णो द्वाराचे काम पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली शासन निधीतून सुरू आहे.

मंदिर संवर्धन व जिर्णो द्वार आराखड्यातील प्रस्तावित कामांपैकी बाजीराव पडसाळी, गर्भगृह, सोळखांबी, सभामंडप व इतर ठिकाणी काम सुरू आहे. १५ मार्चपासून गाभार्यात जतन व संवर्धन करण्याच्या कामामुळे भाविकांना विठुरायाचे चरणस्पर्श करता येत नव्हते. हे काम अंतिम टप्प्यात आलं असून २ जून पासून पदस्पर्श दर्शन पुन्हा सुरू करण्यात येत आहे. तत्पूर्वी मंदिरात हे तळघर सापडलं आहे. त्यामुळे आणखी काही तळघरे मंदिरात आहेत का याचाही शोध पुरातत्व विभागाकडून घेतला जाणार आहे.

कोरोनात भाऊ भावापासून दुरावला तेव्हा 'आरोग्य सेवक'च धावला

सतीश बुद्धे : साताऱ्यात 'एम. बी. कोष्टी उत्कृष्ट आरोग्य सेवक पुरस्कारा'चे वितरण

सातारा : 'कोरोना काळात आरोग्याची आणीबाणी आली होती. या काळात संसर्गाच्या भीतीने भाऊ भावापासून लांब चालला होता. त्या काळात 'आरोग्य सेवक'च धावून आले होते. कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय रुग्णांची काळजी घेत होता. त्यामुळे आरोग्य सेवकांच्या कामाचे कौतुक करावे, तेवढे कमीच आहे,' असे प्रतिपादन साताऱ्याचे गटविकास अधिकारी सतीश बुद्धे यांनी केले.

साताऱ्यात 'जागतिक आरोग्य दिना'च्या पार्श्वभूमीवर 'एम. बी. कोष्टी उत्कृष्ट आरोग्य सेवक पुरस्कार' खावली येथील 'आरोग्य सेवक' दादासाहेब पवार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी

अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजेंद्र जाधव, सहायक जिल्हा हिवताप अधिकारी श्रीमंत माळवे, जिल्हा विस्ताराधिकारी महेश पिसाळ, वाईचे तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विनय भोईटे, 'लोकमत'चे आवृत्ती प्रमुख दीपक शिंदे उपस्थित होते.

सतीश बुद्धे म्हणाले, 'कोरोनामुळे आपल्याला आरोग्य ही किती महत्त्वाची बाब आहे, हे दाखवून दिले आहे. सातारा जिल्ह्यातील सर्वच आरोग्य सेवक कशाचीही तमा न बाळगता रुग्ण सेवा बजावत असतात. हीच परंपरा यापुढेही कायम ठेवावी.'

डॉ. राजेंद्र जाधव म्हणाले, 'आरोग्य सेवक हे गावोगावी तळागाळात काम करत असतात. त्यांना कामे करताना प्रचंड अडचणी येत असतात. अनेकजण त्रास देतात; पण आपले काम चोख असल्यास कोणीही तुमच्याकडे बोट दाखवणार नाही. आपण पगार घेतो म्हणून काम करत असलो तरी काही सामाजिक दायित्वातून काम केले पाहिजे. समाजाचे आरोग्य सुधारण्यासाठी धडपडत असताना स्वत:च्या आरोग्याकडेही दुर्लक्ष करू नका. काही व्यसने असतील तर ती बंद करण्याचा प्रयत्न करा. योगा करत जावा. किमान चालण्याचा व्यायाम करत जावा.'

दीपक शिंदे म्हणाले, 'कोरोनामुळे आपणाला खऱ्या अर्थाने आरोग्य सेवकांचे महत्त्व समजले आहे. काही वर्षांपूर्वी गावागावांतून रोगराई पसरू नये म्हणून ही मंडळी सायकलवरुन पावडरचे ओझे, पंप घेऊन फिरत होते.'

महेश पिसाळ म्हणाले, 'सध्या उन्हाळा वाढत आहे. पाण्याची कमतरता असल्याने कीटकजन्य रोगांचे प्रमाण वाढू शकते. त्यामुळे आरोग्य सेवकांनी सतर्क राहावे. कीटकजन्य आजारांचे प्रमाण वाढू नये म्हणून जनजागृती करावी.'

जगदीश कोष्टी यांनी प्रास्ताविक केले. आरोग्य सहायक विशाल रेळेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रगती जाधव-पाटील यांनी मानपत्राचे वाचन केले. शिल्पा कोष्टी यांनी आभार मानले.

यावेळी सर्व तालुका हिवताप पर्यवेक्षक, आरोग्य सेवक उपस्थित होते.

सातारा येथे जागतिक आरोग्य दिनानिमित्ताने 'एम. बी. कोष्टी उत्कृष्ट आरोग्य सेवक पुरस्कार' दादासाहेब पवार यांना प्रदान करण्यात आला. यावेळी गटविकास अधिकारी सतीश बुद्धे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. राजेंद्र जाधव, श्रीमंत माळवे, महेश पिसाळ, डॉ. विनय भोईटे, जगदीश कोष्टी, शिल्पा कोष्टी उपस्थित होत्या.

अहिल्यादेवींचे सुशासन, मंदिरांचा जिर्णोद्धार व महिला सक्षमीकरणाचे कार्य लोकोत्तर : राज्यपाल रमेश बैस

मुंबई : भारताचा वारसा, संस्कृती आणि सामर्थ्य समृद्ध करण्यात लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांचे खूप मोठे योगदान लाभले आहे. अहिल्यादेवींचे सुशासन, मंदिरांचा जिर्णोद्धार व महिला सक्षमीकरणाचे कार्य लोकोत्तर असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती समारंभाचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाचे लोकमान्य टिळक अध्यासन केंद्र, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्र आणि समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मुंबई विद्यापीठाच्या सर कावसजी

जहाँगीर दीक्षांत सभागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विवेकानंद एज्युकेशन सोसायटीज इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज् अँड रिसर्चचे संचालक प्रा. सतीश मोढ, समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र प्रदेशचे कोषाध्यक्ष धीरज बोरीकर, मुंबई विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. अजय भामरे, कुलसचिव प्रा. बळीराम गायकवाड यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दूरदर्शी प्रशासक म्हणून अहिल्याबाईंनी जमीन महसूल व्यवस्थापनाची प्रक्रिया सुलभ केली. त्यांच्या प्रशासन निष्पक्षता, न्याय आणि प्रजेबद्दलच्या कर्तव्याच्या भावना उदार होत्या. महिलांच्या हक्कांसाठी व सामाजिक-आर्थिक उन्नतीचे मार्ग निर्माण करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. आज महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने परिस्थितीत लक्षणीय बदल होत असून सर्वत्र महिलांचे प्रतिनिधीत्व वाढत आहे ही अभिमानाची बाब असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

आपला सांस्कृतिक वारसा जपण्याचे पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे समर्पण वाखाणण्याजोगे आहे. त्यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार तसेच मंदिरांची पुनर्बांधणी केली. अहिल्याबाई होळकर या थोर समाजसुधारक होत्या. माळवा संस्थेत सती प्रथेविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. वाईट प्रथा मोडीत काढत त्यांनी मुलींचे लग्नाचे वय वाढविण्याचे धाडसी पाऊल उचलले. विधवांना मालमत्तेत हक्क दिला असल्याचेही राज्यपाल रमेश बैस यांनी सांगितले.

आज, जसे आपण अहिल्यादेवींचा वारसा लक्षात ठेवतो, तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना नेतृत्व पदे स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करण्याची गरज देखील आपण ओळखली पाहिजे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांना समान भागीदार केल्याशिवाय 'विकसित भारत'चे उद्दिष्ट आपण साध्य करू शकत नाही. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृती जपून, आपण अधिक समावेशक आणि न्याय्य समाजाची निर्मिती केली पाहिजे. अहिल्यादेवी होळकरांचा वारसा पुढे नेण्यासाठी विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजवावी लागणार असून राज्यातील विद्यापीठांना विद्यार्थिनींसाठी अधिकाधिक वसतिगृहे बांधण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

नोकरदार महिलांसाठी अधिकाधिक वसतिगृहे बांधणे व वंचित आदिवासी मुली गरिबीमुळे शाळा सोडणार नाहीत याची सर्वांनी काळजी घेतली जाणे हेही तितकेच महत्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. अधिकाधिक महिला उद्योजिका निर्माण व्हाव्यात, महिलांना अधिक स्टार्टअप सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक असून महिलांना त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या उद्देशाने राज्य आणि केंद्राच्या सर्व योजनांचा लाभ मिळावा याची आपणा सर्वांस खात्री करावी लागणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जळगावहून मुंबई विमान सेवा लवकरच सुरू होणार

जळगाव : भारत सरकारच्या नागरी उड्डाण मंत्रालयाच्या मान्यतेनुसार, उडान ५.० योजने अंतर्गतजळगावविमानतळावरूनएप्रिल महिन्यात गोवा, हैद्राबाद तसेच २७ मे पासून पुणेविमानसेवा'फ्लाय ९१'या विमान कंपनीकडून सुरू आहे. त्यात आता मुंबई-जळगाव अशी विमान सेवा भारत सरकारच्या 'अलायन्स' या विमान सेवा कंपनीकडून लवकरच सुरू होणार आहे. याबाबत नागरी उड्डाण मंत्रालयाकडून हिरवा कंदील शुक्रवारी मिळाला असून अंतिम मंजूरीची प्रक्रिया सुरू असल्याने जून महिन्यात या सेवेला सुरूवात होण्याची शक्यता आहे.जळगावकरांना लगेच गाठता येणार मुंबई

जळगावातील अनेकांना मंत्रालयात, व्यापार तसेच अन्य कामानिमित्त मुंबईला रेल्वे किंवा ट्रॅव्हलने जावे लागत असते. परंतू ८ ते १० तास प्रवास करून काम आटोपून पुन्हा लगेच रेल्वे व ट्रॅव्हलने प्रवास करावा लागतो. त्यामुळे मुंबई-जळगाव विमान सेवा सुरू झाल्यावर अर्धा ते एक तासात मुंबई गाठता येणार आहे.व्यापाऱ्यांसाठी सेवा फायदेशीर

जळगावातील व्यापाऱ्यांना बऱ्याचवेळा मुंबईला व्यापार व उद्योग वाढीबाबत जावे लागत असते. परंतू मुंबईच्या प्रवासात अधिक वेळ जात असल्याने व्यापारी वर्गाकडून मुंबई-जळगाव विमान सेवा सुरू करण्याबाबत लोकप्रतिनिधी तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ण्ड इंडस्ट्रीजच्या माध्यमातून मागणी केली जात होती. या मागणीनुसार अलायन्स विमान कंपनीकडून मुंबई-जळगाव विमान सेवेला मान्यता मिळाली असून जून महिन्यात ही विमान सेवा सुरू होणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांना या सेवेचा मोठा फायदा मिळणार आहे.भारतीय नागरी उड्डाण मंत्रालयाने 'अलायन्स एअर' या विमान कंपनीला जळगाव विमानतळावरून मुंबईची विमानसेवा सुरू करण्याची परवानगी दिली आहे. त्यामुळे जळगावकरांसाठी व्यापार व उद्योग वाढीच्या दुष्टीकोनातून आनंदाची बाब आहे. गोवा व पुणे पाठोपाठ मुंबईचींही विमानसेवा सुरू होत असल्यामुळे, जळगावच्या हवाई सेवेला विशेष महत्व प्राप्त होणार आहे.

- सुनीत कोठारी, अध्यक्ष, नागरी विमान वाहतुक समिती आणि जनसंपर्क समिती औरंगाबाद पर्यटन विकास प्रतिष्ठान.जळगाव विमानतळावरून आता मुंबई विमान सेवा देखील सुरू होणार आहे. या विमान सेवेसाठी चांगला स्लॉट मिळायला हवा जेणेकरून मुंबईला जाणारे व्यक्ती काम करून लगेच पुन्हा परत येऊ शकतील.

निवृत्ती वेतन धारकांनी फेक कॉल, मेसेजपासून सावध राहावे

लेखा व कोषागारे संचालनालयाचे आवाहन

मुंबई, : अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि राज्यातील सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांमधून निवृत्तीवेतनधारक, कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात. सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत, प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयांमार्फत फोन करून संपर्क साधला जात नाही. तसेच ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार कार्यालयांमार्फत फक्त लेखी स्वरूपात पत्रव्यवहार केला जातो. अशा येणाऱ्या संदेशाबाबत सावध राहून कुणीही प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना दूरध्वनी, भ्रमणध्वनीद्वारे ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारांतील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा दूरध्वनी अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत केला जात नाही. तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.

दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरून प्रदानासंदर्भात संपर्क साधून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरणेबाबत अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत कळविले जात नाही. अशा दूरध्वनी, भ्रमणध्वनीला प्रतिसाद देवून निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकांची वैयक्तिक जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

तसेच अशा प्रकारचा दूरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया आपण निवृत्तीवेतन घेत असलेल्या अधिदान व लेखा कार्यालय अथवा जिल्हा कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमत: संबंधित निवृत्तीवेतन घेत असलेल्या कार्यालयांशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाचे संचालक दीपा देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

निवृत्तीवेतनधारकांनी फेक कॉल, मेसेजपासून सावध राहावे : लेखा व कोषागारे संचालनालयाचे आवाहन

मुंबई, : अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि राज्यातील सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांमधून निवृत्तीवेतनधारक, कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात. सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत, प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयांमार्फत फोन करून संपर्क साधला जात नाही. तसेच ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार कार्यालयांमार्फत फक्त लेखी स्वरूपात पत्रव्यवहार केला जातो. अशा येणाऱ्या संदेशाबाबत सावध राहून कुणीही प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना दूरध्वनी, भ्रमणध्वनीद्वारे ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारांतील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा दूरध्वनी अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत केला जात नाही. तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.

दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरून प्रदानासंदर्भात संपर्क साधून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरणेबाबत अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत कळविले जात नाही. अशा दूरध्वनी, भ्रमणध्वनीला प्रतिसाद देवून निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकांची वैयक्तिक जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी. तसेच अशा प्रकारचा दूरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया आपण निवृत्तीवेतन घेत असलेल्या अधिदान व लेखा कार्यालय अथवा जिल्हा कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमत: संबंधित निवृत्तीवेतन घेत असलेल्या कार्यालयांशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाचे संचालक दीपा देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

ससून प्रकरणाला राज्य शासनच जबाबदार

शशिकांत शिंदे यांचा आरोप

सातारा : गरिबांचे ससून रुग्णालय भ्रष्टाचाराचे कुरण झाले असून वादग्रस्त डॉक्टरांना पुन्हा ठेवण्यात येत आहे. आताच्या पुणे अपघात प्रकरणातही हेच दिसले. त्यामुळे डॉ. तावरे आणि इतर डॉक्टरांना कोणत्या मंत्र्याने पाठिंबा दिला याची चौकशी करावी. तसेच यामध्ये सातारा जिल्ह्यातीलही एक आमदार आहे. या सर्वाला राज्य शासनच जबाबदार आहे, असा थेट आरोप आमदारशशिकांत शिंदेयांनी केला.

साताऱ्यातील राष्ट्रवादी भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत आमदार शिंदे बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील माने, सरचिटणीस राजकुमार पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दीपक पवार आदी उपस्थित होते.

आमदार शिंदे म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून पुण्यातील ससून रुग्णालयाबाबतच्या सुरस कथा बाहेर येत आहेत. याला सर्वस्वी शासनच जबाबदार आहे. राज्य सरकार, मंत्र्यांचे दुर्लक्ष आहे. तसेच वादग्रस्त डॉक्टरांना त्यांचेच अभय आहे. सध्याची परिस्थिती पाहता चौकशी समिती नेमण्यात आली असलीतरी तो एक फार्सच ठरणार आहे. कारण, हे सरकार आल्यापासून नुसत्या चौकशी समितीच स्थापन करत आहे. त्यातून काहीही होत नाही. त्यामुळे या चौकशी समितींची चौकशी करण्याची वेळ आलेली आहे.

ससून रुग्णालयातील डॉ. तावरे आणि इतर डॉक्टरांना कोणत्या मंत्र्याने पाठिंबा दिला याची चौकशी करावी. राज्य शासनानेही याबाबत खुलासा करावा. नाहीतर सरकारच संबंधित मंत्र्यांना पाठिशी घालत आहे असा लोकांत समज होईल, असे सांगून आमदार शिंदे पुढे म्हणाले, ससून रुग्णालयाबाबत औषधांच्या तक्रारी आहेत. माणसं मरतायत. पैसे दिल्याशिवाय काम होत नाही. त्यामुळे ससूनमधील पूर्वीच्या घटांचाही तपास करण्याची गरज आहे.- ऊतएठढखडएचएछढझुेशीशव लूरुबीमधील किडणी रॅकेटवरही भाष्य..

पुण्यातील रुबी रुग्णालयातील किडनी रॅकेटमध्येही काही डॉक्टरांची नावे समोर आली होती. गरिबांना किडनी मिळत नाही. पण, याच गरिबांची किडनी श्रीमंताना मिळाली. किडनी रॅकेटचीही सीबीआय चौकशी करावी. रुबीतील किडनी रॅकेटप्रकरणाचा अहवाल येण्यापूर्वीच रुग्णालयाच्या परवान्याचे नुतनीकरण करुन दिले आहे, असा आरोपही आमदार शिंदे यांनी केला.आम्ही ३५ च्यावर गेलो तर राज्यात घडामोडी..

आमदार शशिकांत शिंदेयांनी लोकसभा निवडणूक निकालावरही भाष्य केले. ते म्हणाले, मी गल्ली गाजवली, तसेच आता दिल्लीही गाजवणार आहे. दिल्लीत आता इंडिया आघाडीचेच सरकार येईल. राज्यात आम्हाला ३० ते ३५ जागा मिळतील. महाराष्ट्रात ३५ च्यावर जागा मिळाल्या तर राज्यात लवकरच मोठ्या राजकीय घडामोडी होतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

घाटमाथ्यावर पेरणीपूर्व मशागती अंतिम टप्प्यात ; बागांना जीवदान

घाटनांद्रे : २५ मे पासून रोहीणी नक्षत्रास प्रारंभ झाला तर २६ मे रोजी सायंकाळी वीज वार्यासह दमदारपाऊसझाल्याने घाटमाथ्यावरील घाटनांद्रे,तिसंगी,वाघोली,गर्जे वाडी,कुंडलापुर,जाखापुर व कुची परिसरात उरल्यासुरल्या पेरणीपूर्व मशागती आवरत्या घेऊन बळीराजा खरीपाच्या पेरणीसाठी सज्ज झाला आहे.तर या पावसाने द्राक्ष शेतीलाही मोठे चांगलेच जीवदान मिळाले आहे.

चालू वर्षी कवठेमहांकाळ तालुक्यातील घाटमाथ्यावर उन्हाळी,अवकाळी पावसाने चांगलीच पाठ फिरविल्याने पेरणीपूर्व मशागती रखडल्या होत्या तर पाण्याविना द्राक्षबागही संकटात मोठ्या सापडल्या होत्या.या परिसरातील बळीराजाने अगदी एप्रिल महिन्यातच खरड छाटणी घेतली होती. मात्र वाढत्या तापमान व तीव्र पाणीटंचाईमुळे या द्राक्षबाग मोठ्या संकटात सापडल्या होत्या. काड्याची वाढ पाण्याअभावी खुंटत चालली होती.त्यामुळे जर काड्या परिपक्व झाल्या नसत्या तर पुढे उत्पन्नावर याचा मोठा परिणाम झाला असता.परंतु रविवारी झालेल्या गरगरीत पावसाने द्राक्ष शेतीला चांगलेच जीवदान मिळाले आहे.तर सध्या काही अंशी ढगाळ वातावरण निर्माण होत आहे.

या भागातील जमीन ही सुपीक व कसदार असल्याने तसापाऊसवेळेवर व समाधानकारक झालाच तर खूप मोठा पिक परतावा या जमीनीकडून मिळतो.पण बरेच वर्षे असं घडलं नाही.सततच्या दुष्काळाने बैलांची संख्याच रोडावल्याने येथे सर्वच मशागती करण्यासाठी यांत्रिकीकरणाचा आधार घ्यावा लागतो आहे.

त्यामुळे नांगरट,कुळवण करून पालापाचोळा वेचणू व बांधबंदिस्ती करून बळीराजाने शेतीला सेंद्रीय खताचा मात्रा देऊन खरिपाच्या पेरणीसाठी तो सज्ज झाला आहे.आता फक्त आणि फक्त त्याला पावसाची ओढ लागली असुन त्याच्या सर्वच नजरा या सध्या आभाळाकडे लागल्या आहेत.

चालू वर्षी मान्सून वेळेवर व समाधानकारक होणार या अंदाजाने व रविवारी झालेल्या समाधानकारक पाऊसाने घाटमाथ्यावरील बळीराजाने पाऊसाविना रखडलेल्या खरिपाच्या पेरणीपूर्व मशागती सध्या आवरत्या घेतल्या आहेत.घाटमाथ्यावरील अगदी सर्वच शेतीही पावसावर आधारित आहे.काही भागात जलसिंचन योजनेचे पाणी आले आहे पण ते अगदी बेभरवशाचे असते. ''पाहीजे त्यावेळी नसते व नको त्या वेळी दाखल होते'' अशी गत या पाण्याची.

मेगाब्लॉकमुळे चाकरमण्यांचे मेगा हाल !

पहिला दिवस प्रवाशांच्या कसरतीचा ठरला : मुंबई ठाणे रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

मुंबई : मुंबई ठाण्यात रेल्वेने तीन दिवसांचा मेगा ब्लॉक घेतल्याने पहिल्याच दिवशी चाकरमण्यांचे मेगा हाल झाले. प्रत्येक रेल्वे स्थानकांवर मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे शुक्रवारचा पहिला दिवस प्रवाशांच्या कसरतीचा ठरला. तसेच दुसरीकडे रस्त्यावरही प्रचंड वाहतुक कोंडीला प्रवाशांना सामोरे जावे लागले. मुंबई ते ठाणे दिशेने जाणा-या वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. रेल्वेच्या 'जम्बो ब्लॉक' कालावधीत सार्वजनिक सेवा वाहनांना प्रवासी वाहतुकीस परवानगी देण्यात आली.

रेल्वे प्रशासनाकडून ठाणे ते सीएसटी दरम्यान तीन दिवसांचा जम्बो मेगाब्लॉक घेण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात फलाट क्रमांक १० आणि ११ तर ठाणे रेल्वे स्थानकात फलाट क्रमांक पाच आणि सहाचे रुंदीकरणाचे काम सुरूअसल्याने ६३ तासांचा जम्बो ब्लॉक सुरू आहे. यामुळे लोकलच्या एकूण ९३० फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. शुक्रवारी १६१ , शनिवारी ५३४, तर रविवारी २३५ लोकल फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. गुरूवारी मध्यरात्री साडे बारापासून सुरू झालेला हा विशेष ब्लॉक रविवार दुपारपर्यंत सुरू राहणार आहे. मात्र यामुळे अनेक गाड्या, लोकल्स रद्द करण्यात य़ेणार असून कामावर निघालेल्या प्रवाशांना मात्र मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागला. मध्य रेल्वेवर रोज सुमारे ७० लाखांहून अधिक प्रवासी प्रवास करतात. मेगा ब्लॉकमुळे प्रवाशांना खूपच मनस्ताप सहन करावा लागला.

मेगा ब्लॉकमुळे कल्याणहून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस कडे जाणाऱ्या काही गाड्या रद्द झाल्याने लोकल गाड्या पंधरा मिनिटे उशिराने धावत होत्या. डाऊन साईडची फास्ट ट्रॅक वरील लोकल सेवा पूर्णपणे बंद होती. स्लो ट्रॅक वर लोकल गाड्या उशिराने सुरु असल्याने मुंबई कडून कर्जत व कसाऱ्याला जाणाऱ्या प्रवाशांचे हाल झाले. त्यामुळे प्रत्येक रेल्वे स्थानकावर प्रवाशांची प्रचंड गर्दीचा महापूर लोटला होता. स्टेशनवर गर्दी आणि लोकलमध्येही गर्दीच. प्रवाशांनी गच्च भरलेली लोकल स्टेशनवर थांबायच्या आतच लोकांची आत शिरण्याची धडपड सुरू होती. त्यामुळे लोकलमधून चढणे आणि उतरणे प्रवाशांना मुश्किल झाले होते. अनेक प्रवाशी यामध्ये धडपडल्याचे प्रकार घडले. उपनगरातून मुंबईत येणाऱ्या लोकांना मोठा त्रास सहन करावा लागला तर संध्याकाळी कार्यालय सुटल्यानंतर देखील स्थानकांवर प्रवाशांची मोठी गर्दी होती.

लांब पल्ल्याच्या गाड्याही रद्द

मध्य रेल्वेच्या या जम्बो मेगाब्लॉकमुळे फक्त लोकल सेवेवरच परिणाम झालेल नाही तर अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांचे वेळापत्रकही कोलमडले. मुंबई ते पुणे, नागपूर, अमरावती, कोल्हापूर अशा इंटर सिटी ट्रेनसह लांबपल्ल्याच्या ट्रेन रद्द करण्यात आल्या. मुंबई-हावडा दुरांतो एक्स्प्रेस तब्बल सात तास उशिराने धावणार असून सीएसएमटी ऐवजी दादर स्थानकातुन रात्री एक वाजता सुटणार आहे. अतिशय महत्वाचे काम असेल, फारच आवश्यकता असेल तरच मुंबईकरांनी प्रवास करावा असे आवाहन मध्य रेल्वेकडून करण्यात आले.

वाहनांच्या लांबच लांब रांगा

मुंबई ते ठाणेच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. मुलुंड टोलनाका ते ऐरोली ब्रिज पर्यंत मोठी वाहतूक कोंडी आहे. एकीकडे मध्य रेल्वेचा मेगाब्लॉक असल्याने खाजगी वाहने घेऊन कर्मचारी कामावर घेऊन आले आहेत. त्यामुळे आज सकाळी आणि आता संध्याकाळी देखील वाहतूक कोंडीचा सामना प्रवाशांना करावा लागत आहे. सकाळी देखील ऐरोली जवळ कंटेनरचा अपघात झाल्याने वाहतूक कोंडीचा सामना वाहनधारकांना करावा लागला होता.

बेस्टची अधिक सेवा

मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक असल्याने बेस्ट प्रशासनाने अधिक बसेस सोडल्या होत्या. त्यामुळे बेस्टमध्येही प्रवाशांची गर्दी उसळली होती.

मुंबई विद्यापीठाकडून सुट्टी

मुंबई विद्यापीठातील संलग्न शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उद्या सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. १ जून २०२४ रोजी मध्य रेल्वेच्या मेगाब्लॉकमुळे कर्मचाऱ्यांना सुट्टीचा निर्णय घेण्यात आला आहे. पहिल्या शनिवार सुट्टी दिल्याने महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सर्व कर्मचाऱ्यांना कामावर येणे अनिवार्य असेल.

मध्य रेल्वेच्या मेगा ब्लॉकचा मुंबई विद्यापीठाच्या आजच्या परीक्षावर परिणाम झाला नाही. आज विविध विद्याशाखेच्या एकूण ४३ परीक्षा होत्या.परंतु आजच्या रेल्वेच्या मेगा ब्लॉकचा कोणताही परिणाम आजच्या परीक्षेवर झाला नाही. सर्व परीक्षा सुरळीत पार पडल्याची माहिती मुंबई विद्यापीठाने दिली.

दोन परीक्षा पुढे ढकलल्या

रेल्वेच्या मेगा ब्लॉकमुळे मुंबई विद्यापीठाच्या उद्याच्या २ परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मध्य रेल्वेच्या कामासाठी ३० मे २०२४ मध्यरात्रीपासून विशेष मेगा ब्लॉक घेतला जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास जाणे गैरसोयीचे होणार आहे. यामुळे शनिवार दिनांक १ जून २०२४ रोजीच्या होणाऱ्या दोन परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. शनिवार दिनांक १ जून रोजी अभियांत्रिकी शाखेची सत्र ८ चा एक व बीएमएस (५ वर्षीय एकत्रित अभ्यासक्रम) सत्र २ चा एक अशा दोन परीक्षा होत्या. या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या परीक्षेच्या सुधारित तारखा लवकरच जाहीर केल्या जाणार असल्याचे विद्यापीठाने कळवले आहे.

मुंबईतील मध्य रेल्वेच्या महा मेगाब्लॉकमुळे पुणे एसटी विभागाकडून मुंबईसाठी जादा गाड्या सोडण्यात आल्या . छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल वरील फलाटांच्या विस्तारीकरणाच्या कामामुळे अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. प्रवाशांचे हाल होऊ नयेत यासाठी पुण्याहून मुंबईकडे जाण्यासाठी ४० जादा बसेस सोडण्यात येतील . रेल्वे गाड्या रद्द असल्याने एसटीवर प्रवाशांचा ताण पडेल हेच लक्षात घेऊन एसटी महामंडळाच्या पुणे विभागाकडून जादा गाड्याचं नियोजन करण्यात आलं आहे.

सार्वजनिक सेवा वाहनांना प्रवासी वाहतुकीस परवानगी

मध्य रेल्वेमार्फत तांत्रिक कामासाठी ६३ तासांचा जम्बो ब्लॉक घेतला आहे. या कालावधीत सर्वसामान्य जनतेची गैरसोय होऊ नये म्हणून जम्बो ब्लॉकच्या कालावधीत प्रवासी वाहनांमधून प्रवाशांची वाहतूक करण्यासाठी परवानगी देण्यात आली. ही परवानगी मुंबई महानगर परिक्षेत्रातील सर्व प्रकारच्या सार्वजनिक सेवा वाहनांतून प्रवाशांच्या टप्पा वाहतुकीस जम्बो ब्लॉक संपेपर्यंतच्या कालावधीसाठी असणार आहे, असे परिवहन विभागाचे सहसचिव राजेंद्र होळकर यांनी अधिसुचनेद्वारे कळविले आहे.

मराठा आरक्षणाची जाहिरात देण्यापेक्षा.., संभाजीराजेंचे सरकारला आवाहन

कोल्हापूर : मराठा समाजाला आरक्षण दिल्याची जाहिरात करण्यापेक्षा राज्य सरकारने मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीमध्ये मदत करावी असे आवाहन संभाजीराजे छत्रपती यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केली.

मराठा आरक्षणासाठीराज्य सरकार ६० कोटी रुपयांची जाहिरात करत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यावर सरकारने अशाप्रकारे खर्च केला असेल तर ते चुकीचे आहे, असे संभाजीराजे म्हणाले. त्यांनी या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली.मराठा आरक्षणआम्ही दिले असे सरकार अजून म्हणू शकत नाही. हे आरक्षण न्यायालयात टिकेल तेव्हा ते आरक्षण आम्ही दिले असे म्हणणे योग्य आहे.

आम्ही आरक्षण दिले असे म्हणण्यापेक्षा सरकारने अशाप्रकारे गरीब मराठा समाजाची जाहिरातीच्या माध्यमातून मराठा समाजाला न्याय कसे देणार हे सरकारने जाहिरातीच्या माध्यमातून सांगितले असते तर ते योग्य झाले असते. तेव्हा जाहिरात देण्यास आमची काही हरकत नसती, तुम्ही आरक्षण दिलं असेल तर ती तुमची जबाबदारीच आहे, त्यासाठी जाहिरात करण्याची गरज नाही, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांबद्दल राग नाही

शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी देशातील सर्वच मुख्यमंत्र्यांना निमंत्रण दिलेले आहे. सर्व देशांच्या राजदूतांना पुढील वर्षीपासून या सोहळ्यासाठी निमंत्रण देउ असे संभाजीराजे म्हणाले. या सोहळ्यासाठी सामान्य शिवभक्त हाच सेलिब्रेटी असेल, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजित पवार यांना प्रत्यक्ष भेटून निमंत्रण दिले आहे. माझ्या मनात त्यांच्याबद्दल या क्षणी कोणताही राग नाही असे संभाजीराजे म्हणाले. रायगडावर शिवभक्त वाढत आहेत, त्यामुळे सरकारनेही योग्य ते निर्देश प्रशासनाला दिले आहेत, असे ते म्हणाले.

राजकारणापेक्षा शिवराज्याभिषेक सोहळा महत्वाचा : संभाजीराजे छत्रपती

कोल्हापूर : राजकारण आणिशिवराज्याभिषेकमी एकत्र आणणार नाही, एक वेळ निवडणुका आणि राजकारण पुन्हा होतील, पण ३५० वाशिवराज्याभिषेकसोहळा एकदाच होणार आहे. त्यामुळे ४ जूनपेक्षाही ५ आणि ६ जूनचा शिवराज्याभिषेक सोहळाही माझ्यासाठी महत्वाचा आहे, असे मतअखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे मार्गदर्शक संभाजीराज छत्रपती यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. तर,यंदा दुर्गराजरायगडावरपाच लाखांहून अधिक शिवभक्त या सोहळ्यासाठी उपस्थित राहतील अशी अपेक्षा व्यक्त केली.

शिवरायांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ या दिवशी झाला. त्या क्षणाची स्मृती रहावी म्हणून २००७ पासून शिवराज्याभिषेक सोहळा साजरा करत आहे. प्रारंभी दोन हजार शिवभक्त होते, गतवर्षी ५ लाख शिवभक्त गडावर होते. यंदाही हा आकडा ओलांडून जाईल असे संभाजीराजे म्हणाले.

यावेळी समितीचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष आणि उपाध्यक्षांनी सोहळ्याची सविस्तर माहिती दिली. या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्याची तयारी समितीने पूर्ण झाली असून, एकुण ३७ समित्या नियोजनबध्द काम करत आहेत, असे त्यांनी सांगितले.

५ जून हा शौर्य आणि ६ जून हा भक्तीचा दिवस आहे. गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी ५ ठिकाणी अन्नछत्र आहे. शाहीरी कार्यक्रमात २३ शाहीर पोवाडे गाणार आहेत, पालखी मिरवणुकीत १०० मशाली आणि संबळवाद्य असेल, युध्दकला प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी राज्यातून ३५ संघ आणि २५० मावळे सहभागी होणार आहेत. पायथ्याला आणि गडावर मिळून ११ ठिकाणी आरोग्य केंद्र सज्ज राहणार आहेत, धर्मशाळा व इतर ठिकाणी महिलांसह इतर शिवभक्तांची थांबण्याची व्यवस्था केल्याचीही माहिती त्यांनी दिली.

या पत्रकार परिषदेला अमर पाटील, हेमंत साळोखे, सुखदेव गिरि, फत्तेसिंग सावंत, धनाजी खोत, उदय घोरपडे, प्रविण उबाळे, धनाजी खोत, दिलिप सावंत, अनुप महाजन, रणजित पाटील, दीपक सपाटे, प्रसन्न मोहिते उपस्थित होते.

असा आहे शिवराज्याभिषेक सोहळा

५ जून: दुपारी ३.३० वा : जिजाउ समाधीचे दर्शन (पाचाड), सायंकाळी ४ वा. संभाजीराजे छत्रपती, शहाजीराजे छत्रपती पायी गड चढण्यास प्रारंभ (नाणे दरवाजा), ४.३० वा : महादरवाजा पूजन व तोरण बांधणे, ५ वा : पंचक्रोशीतील २१ गावांतील सरपंच, गावकऱ्यांच्या उपस्थितीत शहाजीराजे यांच्या हस्ते गडपूजन (नगारखाना), ५.३० वा. धार तलवारीची युध्दकला महाराष्ट्राची शिवकालीन युध्दकलांची मानवंदना (होळीचा माळ), ७.१५ वा. आतषबाजी, रात्री ८ वा : जागर शिवशाहीरांचा, स्वराज्याच्या इतिहासाचा (राजसदर) , ९ वा. गडदेवता शिरकाई देवीचा गोंधळ (शिरकाई मंदिर), रात्री ९.३० वा. वारकरी संप्रदायाकंडून कीर्तन व भजन (जगदीश्वर मंदिर), ६ जून: सकाळी ७ वा :रणवाद्यांच्या जयघोषात शहाजीराजे यांच्या हस्ते ध्वजपूजन व ध्वजारोहन (नगारखाना), ७.३० वा. शाहिरी कार्यक्रम (राजसदर), ९.३० वा. शिवरायांच्या पालखीचे वाद्यांच्या गजरात आगमन (राजसदर), १०.१० वाजता संभाजीराजे यांच्या हस्ते शिवरायाच्या उत्सवमूर्तीस अभिषेक (राजसदर) , १०.२० वा. शिवरायांच्या पुतळ्यास सुवर्णनाण्यांचा अभिषेक (मेघडंबरी), १०.३० वा. सभांजीराजे यांचे मार्गदर्शन, ११ वा. जगदीश्वराच्या दर्शनासाठी शिवरायांच्या मुख्य पालखी सोहळ्यास प्रारंभ, १२ वा. जगदीश्वराचे दर्शन, १२.१० वाजता शिवरायांच्या समाधीस अभिवादन.

सांगली जिल्ह्यात एकीकडे पाण्यासाठी वणवण, तर कृष्णाकाठी पाणीच पाणी

बोरगाव : महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दुष्काळाच्या झळा व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असताना, कृष्णानदीपात्र दुथडी वाहत असल्याने नदीकाठावर पाणीच पाणी पहायला मिळत असल्याने जनतेतून आनंदी वातावरण पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे याच पाण्याचा गैरवापर करून पाण्याची नासाडी ही केली जात आहे.

सांगली जिल्ह्यातील जत, कवठेमहांकाळ तालुक्यात व राज्याच्या अनेक भागांत टॅकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. उन्हाच्या दाहकतेने नद्या, विहीरी, ओढे, कॅनाल ही कोरडे ठणठणीत पडले आहेत. जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण व भटकंती करावी लागत आहे. माणसा बरोबर जनावरांच्या ही चाऱ्याचा व पाण्याचा गंभीर प्रश्न रूप धारण करत आहे.

काही भागातील शेतातील उभी पिके पाण्याविना करपू लागली आहेत. अशा भीषण परिस्थितीत उद्भवली असताना कृष्णा नदी काठावरील नागरिकांना मात्र पाणीच पाणी उपलब्ध होत असल्याने पाण्याची कोणत्याच प्रकारची झळ बसताना दिसत नाही. हि बाब कृष्णा नदी काठावरील नागरिकांनी भाग्यशाली ठरत आहे. कृष्णा नदी दुथडी वाहत असल्याने नदी काठावरील बोरगाव, रेठरेहरणाक्ष, ताकारी, बहे, तांबवे नरसिंहपूर, वाळवा, भिलवडी पर्यंतच्या भागात पाणीच पाणी आहे.

कृष्णा काठावरील मुबलक पाण्यामुळे नदीकाठावरील जनता स्वत:लागली भाग्यशाली समजत आहे. अशी परिस्थिती असताना काही ठिकाणी पाण्याचा विनियोग व पाण्याची नासाडी चालल्याचे चित्र ही कृष्णा काठावर पाह्यला मिळत आहे. नागरिकांनी पाणी टंचाई भागाची परिस्थिती डोळ्या समोर आणावी व पाण्याचा गैरवापर व नासाडी थांबवावी.

डोंबिवलीतील कारखाने स्थलांतरणास विरोध

शेकडो उद्योजक उतरले रस्त्यावर !

डोंबिवली :- डोंबिवलीतील स्फोटानंतर राज्य सरकारने धोकादायक कारखाने स्थलांतरीत करण्याचे आदेश दिले आहेत मात्र कारखाने स्थलांतर करण्यास उद्योजकांचा ठाम विरोध आहे. शुक्रवारी उद्योजकांची संघटना असलेल्या कामा संघटनेच्यावतीने शेकडो उद्योजकांनी डोंबिवली एमआयडीसी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. कारखाने स्थलांतर करण्यास नकार देत राज्य सरकारने एकतफी निर्णय न घेता कामा संघटनेच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करावी अशी मागणी केली.

डोंबिवलीमध्ये अमुदान कंपनीमध्ये झालेल्या स्फोटानंतर डोंबिवलीतील सर्वच कंपन्या डोंबिवली मधून स्थलांतरित करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उद्योग मंत्री उद्या सामंत यांनी दिल्यानंतर डोंबिवली प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि एमआयडीसी अधिकाऱ्यांनी डोंबिवलीतल्या सर्वच कंपनीला नोटीस पाठवत तात्काळ स्थलांतरित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत तर काही कंपन्यांना क्लोजर नोटीस नोटीस देऊन त्या कंपनीचे लाईट व पाणी कलेक्शन बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत या विरोधातच आज डोंबिवली मधल्या सर्व कंपनीच्या मालकांनी एमआयडीसी कार्यालयावर धडक देत प्रदूषण नियंत्रण अधिकारी व एमआयडीसी अधिकाऱ्यांना कार्यालयात घुसून जाब विचारला या वेळेला कंपनीच्या मालकांनी गोंधळ घालत स्थलांतराला विरोध असल्याचं सांगत अधिकाऱ्यांना निवेदन दिले

सागरेश्वर अभयारण्यात साळिंदर, सांबरासह ५२३ प्राण्यांचे दर्शन

सांगली : कोल्हापूर वन्यजीव विभागामार्फत सागरेश्वर अभयारण्यातील आठ पाणस्थळावर २३ मे रोजी प्राणीगणना करण्यात आली. यामध्ये १७१ चितळ, २२० सांबर आणि केवळ चार सशांचे दर्शन झाले. या प्राणीगणनेमध्ये १४ वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्यासह आठ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. वन्यजीव विभागामार्फत दरवर्षी मे महिन्यामध्ये बुध्द पौर्णिमेच्या दिवशी सागरेश्वर अभयारण्यात प्राणीगणना करण्यात येते.